**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०२ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन; वाराणसी इथं २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं उद्घाटन आणि लोकार्पण.**
2. **विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा अंगीकार करत ध्येय गाठावं - सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचं आवाहन, डॉ.आंबेडकर महाविद्यालयाचा हिरक महोत्सवी सोहळा उत्साहात संपन्न.**
3. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज नागपुरात बुद्धिबळपटू दिव्या देशमुखचा नागरी सत्कार, शासनातर्फे 3 कोटी रुपयांचा धनादेश वितरित.**
4. **दक्षिण- मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे १ ते १५ ऑगस्ट पर्यंत 'स्वच्छता पंधरवडाचे' आयोजन.**

-------------------------------------------

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति असलेल्या सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असून, गेल्या दशकभरात शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्येचं निराकरण करण्यासाठी सरकारने पूर्ण क्षमतेनं काम केल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता जारी करताना बोलत होते. या हप्त्या-मधून देशभरातल्या ९ कोटी ७० लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २१ हजार कोटी रुपये थेट हस्तांतरित केले जातील. सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देऊन 'व्होकल फॉर लोकल'ला पाठबळ देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

***(होल्ड बाईट'- पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***जो चीज भारत के लोगों के कौशल्य से बनी है, भारत के लोगों के पसीने से बनी है। हमारे लिए वह स्वदेशी है, हमें 'वोकल फॉर लोकल' मंत्र को अपनाना होगा। हम***

***संकल्प लें कि हम 'मेक इन इंडिया' प्रोडक्ट्स को ही बढ़ावा देंगे। हमारे घर में जो भी नया सामान आएगा वो स्वदेशी ही होगा।***

पंतप्रधान मोदी यांनी आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथे सुमारे २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं उद्‌घाटन आणि पायाभरणी केली. यावेळी त्यांनी 'दिव्यांगजन' आणि वृद्ध लाभार्थ्यांना ७ हजार ४०० सहाय्यक साहित्याचं वितरण केलं.

-----------------------------------------

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

पीएम किसान सन्मान निधीचा विसावा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज वितरित झाला. त्यानिमित्त बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्र येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव सहभागी झाले होते. त्यांनी शेतकऱ्यांसमवेत पंतप्रधान मोदी यांचे वाराणसी येथे सुरू असलेले भाषण ऐकले. ही योजना केवळ आर्थिक योजना नाही तर देशातील अन्नदात्याच्या कष्टाचा हा सन्मान असल्याचेही जाधव यावेळी म्हणाले.

-----------------------------------------

रामदास आठवले

मत्स्यशेतीला राज्य सरकारनं कृषीचा दर्जा दिला आहे. त्याप्रमाणे भारत सरकारकडूनही मत्स्यशेतीला कृषीचा दर्जा मिळावा तसंच प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा लाभ मच्छीमारांना मिळावा, यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. मुंबईतल्या वर्सोवा इथं केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित पी एम किसान सन्मान निधी वितरण कार्यक्रमात ते दृकश्राव्य माध्यमातून बोलत होते.

-----------------------------------------

डॉ.आंबेडकर महाविद्‌यालय

स्वत:चा विकास साधताना समाजातील मागास घटकांना पुढे घेवून जाण्याचा महान विचार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांना दिला असून या विचारांचा अंगिकार करत विद्‌यार्थ्यांनी आपले ध्येय गाठावे, असे प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आज नागपूर इथं केले. दीक्षाभूमी स्मारक समिती संचालित डॉ.आंबेडकर महाविद्‌यालयाच्या हिरक महोत्सवी सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांचा अंगिकार आणि त्यातून मार्गक्रमण करणे, हीच डॉ. आंबेडकर महाविद्‌यालयासाठी आयुष्य वेचणाऱ्या

व्यक्तींना आदरांजली ठरेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते, तर दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई अध्यक्षस्थानी होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती चंद्रशेखर, दीक्षाभूमी स्मारक समितीच्या सदस्या डॉ.कमल गवई, सुधीर फुलझेले, राजेंद्र गवई, प्रदीप आगलावे आदी यावेळी उपस्थित होते. तत्पूर्वी, मुख्यमंत्री फडणवीस आणि भदंत ससाई यांच्या हस्ते सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ.आंबेडकर महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री फडणवीस आणि सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यापैकी अधिक संख्या मुलींची असल्या बद्दल गवई यांनी समाधान व्यक्त केलं

***(होल्ड बाईट -सरन्यायाधीश भूषण गवई)***

***बाबासाहेब नेहमीच म्हणायचे कि जर कुठल्या समाजाची प्रगती जी झाली आहे हे जर बघायचं असेल तर त्या समाजातल्या महिलांची किती प्रगती झालेली आहे. That is a yardstick for considering as to whether the society has progressed or not आणि आज मला आनंद आहे की, या पाच ही जणांनी जे आपआपल्या क्षेत्रामध्ये कार्य केलेलं आहे त्याबद्दल त्यांचं आपण जेवढे कौतुक करावं तेवढ कमी आहे आणि त्या पाच पैकी चार जे ८० टक्के या मुली आहेत आणि खऱ्या अर्थाने आज आपण वुमन एम्पावरमेंटमुळे जर क्रॉस करत असू, तर ती बाबासाहेबांना खऱ्या अर्थाने आपण वाहलेली आदरांजली आहे.***

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित शिक्षण आणि शिक्षणाचा दर्जा मिळवत डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने वंचित समाजाला शिक्षणाची दारं उघडी करून दिली आणि त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविले. गेल्या ६० वर्षांची गौरवशाली पंरपरा असणारे हे महाविद्यालय गुणवत्तेचा प्रवास विस्तारून नवनवीन शिखर गाठेल, असा विश्वास व्यक्त करत समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणून या महाविद्यालयाने कार्य करावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केली.

-------------------------------------------

सामाजिक न्याय भवन

अकोला शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनच्या नवीन इमारतीचं लोकार्पण आज करण्यात आलं. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते हे लोकार्पण झालं.

--------------------------------------------

दिव्या देशमुख

महाराष्ट्र शासनाने क्रीडा क्षेत्राला कायम प्राधान्य दिले आहे. खेळाडूंना मोठी ध्येयं खुणावत असून यासाठी तंत्रशुध्द प्रशिक्षण, सकस आहार, परदेशी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन या गोष्टी आवश्यक आहेत. जागतिक स्तरावरील स्पर्धांमध्ये यश मिळवायचे असल्यास या गोष्टी आवश्यक आहेत. खेळाडूंना अधिकाधिक दर्जेदार आणि अद्ययावत सुविधा पुरविण्याचा प्रयत्न आहे. दिव्या देशमुखने जागतिक स्पर्धेत मिळविलेले देदीप्यमान यश हे देशातील हजारो मुला-मुलींसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या वेळी मुख्यमंत्र्यांनी नागपूरकर दिव्याचे विशेष कौतुक असल्याचे सांगितले .

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)***

***दिव्यानी हा विजय मिळवला म्हणून एक भारतीय म्हणून मला तुझा खूप मोठा अभिमान आहे. दुसरं मला ह्या गोष्टीच अभिमान आहे, माझ्या महाराष्ट्राची कन्या छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र या महाराष्ट्राची कन्या जागतिक स्तरावर भारताचं नाव उंच करते म्हणून महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून मला तुझा अभिमान आहे. आणि अर्थातंच एक नागपुरकर म्हणून मला या गोष्टीचा अभिमान आहे कि माझ्या नागपुरची दिव्या देशमुख हिने संपूर्ण जगामध्ये हा खिताब मिळवला आणि तोही वयाच्या केवळ एकोणसवीसव्या वर्षी.***

जागतिक बुद्धिबळ स्पर्धा विश्वविजेती ग्रँडमास्टर दिव्या देशमुखचा शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नागरी सत्कार कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित करण्यात आला, यावेळी फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दिव्याचा सन्मान करीत तीन कोटी रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेकडूनही ११ लाख रुपयांचे बक्षिस प्रदान करण्यात आले. तसेच खासदार क्रीडा महोत्सव समितीकडून सन्मान करण्यात आला. क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, वित्त आणि नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेशी संलग्नित जिल्हा संघटनांचे पदाधिकारी, बुद्धिबळपटू, शालेय विद्यार्थी, नागपूरकर मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. जागतिक बुद्धिबळ

स्पर्धा विश्वविजेती ग्रँडमास्टर दिव्या देशमुख हिने यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. राज्य शासनाचं बुद्धिबळ स्पर्धा विश्वविजेती होण्यासाठी मोलाचे सहकार्य मिळाले. ग्रँडमास्टर दिव्या देशमुख हिच्या निवासस्थानी जाऊन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

---

स्वच्छता पंधरवड़ा

भारतीय रेल्वेद्वारे राबविण्यात येणाऱ्या 'स्वच्छ रेल-स्वच्छ भारत' मोहिमेअंतर्गत, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग १ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा पाळत आहे. या अंतर्गत विविध जागरूकता कार्यक्रमांद्वारे विविध मोहिमा राबवून जनतेला स्वछतेविषयी जागरूक करण्यात येत आहे. या पंधरवड्याच्या पहिल्या दिवशी काल विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली शपथ सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्वच्छतेबद्दल जागरूक राहण्याची आणि स्वच्छता राखण्याची शपथ देण्यात आली. आज २ ऑगस्ट रोजी, नागपूर विभागाने नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी स्थानकावर स्वच्छतेशी संबंधित विविध माध्यमांद्वारे स्वच्छतेची जाणीव करून दिली आणि स्वच्छतेशी संबंधित पोस्टर्स हातात धरून मार्गदर्शन केले.

---

हवामान

नागपुरातील प्रादेशिक हवामान केंद्राने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार आज विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, पावसाने विदर्भात गेल्या दोन दिवसांपासून तुरळक अपवाद वगळता विश्रांती घेतली आहे.

---

कसोटी क्रिकेट

इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या आणि अंतिम कसोटी क्रिकेट सामन्यात आजच्या खेळीत भारतातर्फे यशस्वी जयस्वालने नाबाद ८५ धावा केल्या. त्याला आकाशदीपने चांगली साथ दिली. इंग्लंडतर्फे टॉग, एटकिंसन आणि ओवर्टन या गोलंदाजांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. सध्या भारत १६६ धावांनी पुढे आहे. शेवटचं वृत्त हाती आलं, तेव्हा भारताच्या ३ गडी बाद १८९ धावा झाल्या होत्या.

---